आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५

ठळक बातम्या

1. वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडियो व्हिज्यूअल **ॲ**ण्ड एंटरटेनमेंट परिषदेत क्रियेटर इकॉनॉमी साठी निधी उभारला जाणार - माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव.

2. होळीच्या सणाचा सर्वत्र उत्साह, भंडाऱ्यात होळी निमित्त स्वच्छता अभियान, तर नागपुरात विद्यार्थ्यांनी केली आज दुर्गुणांची होळी साजरी.

3. टोल नाक्यावर रोख रक्कम भरल्यास दुप्पट टोल आकारण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयात हस्तक्षेप करायला मुंबई उच्च न्यायालयाचा नकार.

4. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा प्रभार अपर विभागीय आयुक्त डॉ.माधवी खोडे चवरे यांनी आज स्वीकारला.

वेव्हज

वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडियो व्हिज्यूअल **ॲ**ण्ड एंटरटेनमेंट परिषदेत क्रियेटर इकॉनॉमीसाठी १ बिलियन डॉलर्सचा निधी उभारला जाणार आहे. या माध्यमातून वेव्हज कार्यक्रमाला पुढे नेण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिली. या माध्यमातून नवोन्मेष आणि नवकल्पनाकार क्रियेटर्स ला भांडवली प्रोत्साहन देण शक्य होणार आहे. वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडियो व्हिज्यूअल **ॲ**ण्ड एंटरटेनमेंट परिषदेच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत जागतिक समुदायासाठी केंद्र सरकारनं एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी वेव्हज परिषदेत उपलब्ध असलेल्या संधींची माहिती देण्यात आली. जगभरातल्या १०० हून अधिक देशांचे उच्चायुक्त आणि राजदूत याठिकाणी उपस्थिती आहे. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर, माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, माहिती प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी वेव्हजच्या आयोजनाची संकल्पना सांगितली…….

*Basically what we are seeing is there is a major transition in the world of media and entry. That world where community of creator was a small community is changing in a very major way because of the intersection of 3 different worlds. The world of creativity, the world of media and the*

*world of technology. These 3 are today reaching a new level of convergence.*

वेव्हज चे आयोजन राज्याची आर्थिक राजधानी मुंबई मध्ये होत असल्या बद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला...

*As we stand at the confluence of technology, culture and creativity, this platform represents a vital step towards shaping the future of media and entertainment on global scale. By heartfelt thanks to the Government of India and specially to our Hon'ble Prime Minister Shri Narendra Modi Ji and our I&B Minister Shri Ashwini Vaishnaw ji for interesting Maharashtra with the opportunity to host the final leg of WAVES 2025 in Mumbai.*

मुंबईत एक ते चार मे दरम्यान बहू प्रतिक्षीत वेव्हज परिषद होणार आहे.

होळी सण

देशभरात होळीचा सण उत्साहात पारंपारिक पद्धतीने साजरा होत आहे. आज होळी पोर्णिमेनिमित्त संध्याकाळी सर्वत्र होलिका दहन केलं जाणार आहे. होलिका मातेला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून अनिष्टाचा नाश करण्याची प्रार्थना होलिकादहनाच्या वेळी करण्याचा प्रघात आहे. रंगोत्सव अर्थात रंगपंचमी होळीपोर्णिमेनंतर साजरी केली जाते. काही ठिकाणी उद्या धुलीवंदनाच्या दिवशी रंगांची उधळण करत हा उत्सव साजरा केला जाईल. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी होळी तसेच धुलिवंदनानिमित्त सर्व जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. होलिकापूजन तसेच प्रेम, स्नेह व बंधुभावाचे प्रतिक असलेला रंगोत्सव सर्वांच्या जीवनात आनंदाचे रंग भरो व परस्परांमधील द्वेष भावना नष्ट करो, या शुभकामनेसह सर्वांना होळी व धूलिवंदनानिमित्त हार्दिक शुभेच्छा राज्यपाल राधाकृष्णन यांनी दिल्या. होळी आणि होळीच्या दुसरा दिवशी देशात मोठ्या उत्साहात वेगवेगळया रंगांची उधळण करतात. परंतु,भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील गवराळा या गावातील नागरिक मागील 33 वर्षांपासून होळी व रंगाची उधळण करीत नाही. मात्र रंगाचा सण भक्तिरंगात रंगून साजरा करीत असतात या बद्दल अधिक माहिती देत आहेत तिथले पोलीस पाटील -

*किसनबाबा 1992 ला मरण पावले जवळजवळ आता 32 वर्षे होत आहेत कि आम्ही त्यांची पुण्यतिथी साजरी करतो. ज्या दिवशी मरण पावले तो दिवस म्हणजे शिमगाचा होता. आम्ही रंग आम्ही खेळणार नाही त्या दिवशी या दिवशी आम्ही ग्राम स्वच्छता अभियान राखतो आणि प्रबोधनाचा कार्यक्रम मार्फत गावकऱ्यांना मार्गदर्शन करतो. त्यांचा हा करण्याचा उद्देश पुण्यतिथी करण्याचा उद्देश म्हणजे चांगल्या प्रकारे आमचे गावकऱ्यांना मोठा संदेश दिला जेव्हा ते येथे आले होते. ग्राम स्वच्छता अभियान राखत होते आणि त्यांच्या निष्काम सेवेमधून मंदिराची उभारणी केली.*

नागपूर महानगरपालिकेच्या प्रियदर्शिनी मराठी उच्च प्राथमिक शाळा फुटाळा येथील विद्यार्थ्यांनी आज दुर्गुणांची होळी साजरी केली. विद्यार्थ्यांनी विविध वाईट गुण कागदावर लिहिले आणि त्याचे होळीसोबत दहन केले. आपल्यातील दुर्गुणांचे दहन करुन नियमित चांगल्या सवयी अंगीकारण्याचा संकल्प चिमुकल्या विद्यार्थ्यांनी केला. शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.वसुधा वैद्य यांच्या संकल्पनेतील या अभिनव उपक्रमाचे मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरीयांनी कौतुक केले.

चलनफुगवट्याचा दर

फेब्रुवारी महिन्यात किरकोळ चलनफुगवट्याचा दर कमी होऊन तीन पूर्णांक ६१ शतांश टक्क्यांवर आला. गेल्या सात महिन्यातील ही निचांकी पातळी आहे. जानेवारीतील हा दर चार पूर्णांक २६ शतांश टक्के इतका होता.

प्रतापराव जाधव

केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी आज नवी दिल्लीत योग महोत्सव २०२५ चं उद्घाटन केलं. आंतरराष्ट्रीय योग दिन शंभर दिवसांवर आला असून या दिवसात देशाच्या विविध भागात योगाशी संबंधित महत्त्वपूर्ण कार्यक्रम आयोजित केले जाणार असल्याची घोषणा त्यांनी केली. यात योग बंधन हा १० देशात होणारा कार्यक्रम तर योग संगम हा देशातल्या १० हजारांहून अधिक ठिकाणी होणारा कार्यक्रम यांचाही समावेश आहे, असं त्यांनी सांगितलं.

फास्टॅग

राज्यातल्या प्रत्येक टोल नाक्यावर फास्टॅगचा वापर अनिवार्य करणं आणि रोख पैसे दिल्यास दुप्पट शुल्क आकारणं हा राज्य सरकारचा धोरणात्मक निर्णय असल्याचा निर्वाळा आज मुंबई उच्च न्यायालयाने दिला. त्यामुळे या निर्णयात हस्तक्षेप करणार नसल्याचं म्हणत न्यायालयाने फास्टॅग सक्तीच्या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका फेटाळली आहे. पुणे इथे राहणाऱ्या अर्जुन खानापुरे यांनी ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर

मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. राज्य सरकारने आपल्या धोरणाचं समर्थन करताना फास्टॅगमुळे रहदारीत लक्षणीय घट झाल्याचं म्हटलं. हा युक्तिवाद मान्य करून उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली.

<u>महाराष्ट्र भूषण</u>

महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ चा अंतिम निर्णय हा सर्वसंबंधितांशी विचार विनिमय करुन लवकरच जाहीर करणार असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. या पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत ते काल बोलत होते. या समितीच्या अशासकीय सदस्यांनी पुरस्कार निवडीबाबत आपापली मतं मांडली.

<u>सातबारा ऑनलाईन</u>

राज्यात सातबारा ऑनलाईन करण्याची मोहीम राबवण्यात येत आहे. जवळपास नऊ कोटी १२ लाख सातबारा ऑनलाईन केले आहेत. ज्या गावांमध्ये सातबाराचे संगणकीकरण झालं आहे, तिथे १०० टक्के ऑनलाईन फेरफार देण्यात येत असल्याची माहिती, महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली. राज्यात ४२ लाख ३४ हजार फेरफार ऑनलाईन पद्धतीने दिल्याचं सांगून, यामुळे शेतकऱ्यांची होणारी अडचण सोडवली असल्याचं कदम यांनी सांगितलं.

<u>डॉ.माधवी खोडे</u>

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा प्रभार अपर विभागीय आयुक्त डॉ. माधवी खोडे चवरे यांनी आज स्वीकारला. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील कुलगुरू कक्षात प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्याकडून डॉ. माधवी खोडे चवरे यांनी कुलगुरू पदाचा प्रभार स्वीकारला.

कुलगुरू पदाचा प्रभार स्वीकारल्यानंतर डॉ. माधवी खोडे चवरे यांनी वेळेवर परीक्षा घेत तातडीने निकाल घोषित केले जाणार असल्याची माहिती दिली. उन्हाळी २०२५ दरम्यान एक हजार पेक्षा अधिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या जाणार असून याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. विद्यापीठाचे प्रशासकीय कार्य विद्यार्थी केंद्रित असावे, अशा देखील त्या म्हणाल्या.

*****